|| श्री स्वामी समर्थ ||

## || श्री सद्‌गुरू जनार्दन स्वामी महात्म्य ||

श्री गणेश गिरिजानंदना, मंगलमय तुझी छाया |
माझ्या बालबुद्धीसी देवा ठाया, सद्‌गुरूसी नमितो ||१||
श्री स्वामी समर्थांचे मनी आले, शंकरबाबासी सोपविले |
सद्‌गुरू महात्म्य लिहिण्या स्फुरिले, कृपा तयाची ||२||
रामाचा सखा शंकरगीता वाचे, नेम म्हणुनी करतसे |
वेड्यावाकड्या मनाशी लढतसे, विवेकाने वागण्यासाठी ||३||
शंकरगीता सांगे, “गुरूचे गुरू गुरूंना थोर” |
“आपणां आपले गुरू थोर,” म्हणुनी हे महात्म्य स्फुरते ||४||
माझे सद्‌गुरू जनार्दनु, मायेचा कल्पतरू |
कलियुगे जन्म घेती, आम्हासी उद्धरण्या ||५||
शंकरराव खेर हे पिता, व पार्वती हीच माता |
सद्‌गुरू स्वामीने जन्म घेतला, गुरूवारी शुभदिवशी ||६||
मातापित्यासी आनंद जाहला, ब्रह्मांडभूषण पोटी आला |
सद्‌गुरू स्वामी दाखवी बाळलीला, तोषविती आईवडिला ||७||
सद्‌गुरू श्री विष्णूचा अवतार, गरूड येई अवनीवर |
रोज पहाटे सद्‌गुरूसी नेई, तीर्थक्षेत्रासी नदीतीरावर ||८||
आठव्या वर्षी सद्‌गुरूसी, मौंजीबंधनाचा योग येई |
गायत्री माता प्रसन्न होई, सर्व विद्येच्या सूर्यास ||९||
तेराव्या वर्षी सद्‌गुरू, नारेश्वरी गेले |
श्री रंगावधूतांचे दर्शन घेतले, तेज तेजासी भेटले ||१०||
श्री सद्‌गुरू हरीभजनी रंगती, उपास्यदैवत श्री रामासी नमिती |
साधना, अखंड चालतसे ||११||



श्री महाकालीस राहवेना, आली श्री सद्गुरूंच्या भेटीला |
अखंड तेजाच्या ज्योतीला, एकरूप होण्या विनवितसे ||१२||
श्री अम्मूमैय्या गुजरात देशी, सद्गुरूसी भवानी दर्शन देती |
बालपणात, कृतार्थ करिती ||१३||
श्री नानामहाराज तराणेकर, पात्र मूर्तीमंत दत्तकृपेचे |
सर्व तेजोमय ब्रह्मांडात, माझ्या सद्गुरूची वाट पाहती ||१४||
प.पू. टेंबे स्वामी, तसेच अक्कलकोटचे श्री स्वामी समर्थ |
माझ्या सद्गुरूंसाठी झगडत, तिथे भगवान दत्तात्रेय प्रगटत ||१५||
श्री दत्तात्रेयांनी आज्ञाचक्री पाय ठेविला, श्री नाना महाराजांसी अर्पिला |
सिद्धतपस्वी शिष्य जाहला, श्री नानांच्या कृपेसी पात्र ||१६||
श्री स्वामी समर्था हसू आले, श्री टेंबे स्वामी तृप्त जाहले |
श्री गुरूदेव दत्तांचे तेजोमयात, माझे सद्गुरू एकरूप जाहले ||१७||
चौदा विद्या व चौसष्ट कलेचा आगर, माझे सद्गुरू सागर |
सात्विकतेची राहाणी, आणि सिद्धावस्थेत काळ चालिला ||१८||
कालमाने श्री सद्गुरूंनी, गृहस्थाश्रम स्वीकारिला |
तडजोड न करी साधनेला, तपस्वी जीवन जगुनी दाखविती ||१९||
श्री सद्गुरू माझे मायाळू, सर्वकुटुंबियासी आधारू |
सर्वांचे भवतापातील तारू, असे कोठेही मिळेना ||२०||
श्री स्वामी समर्थ कृपेने, स्ववास्तुचा जीर्णोद्धार करी |
पंचलोहाची श्री स्वामींची मूर्ती, पंचमहाभूतांच्या स्वामींनी बनविली ||२१||
अनेकास अनुभूती येऊ लागली, नवीन वास्तु फुलू लागली |
जीवने प्रकाशमान होऊ लागली, माझ्या सद्गुरू सान्निध्ये ||२२||
श्री स्वामी समर्थांची आज्ञा झाली, सद्गुरूंची भ्रमंती सुरू झाली |
रंजल्या गांजल्यांची मुक्ती आली, माझिया सद्गुरू रूपात ||२३||

दुःखितांचे दुःख हरण्यास, समर्थ त्यांना करण्यास |
ध्यानजपाच्या मार्गी लावण्यास, श्री सद्‌गुरूंनी ध्वजा उभारली ||२४||
माझ्या सद्‌गुरूंचे स्वामी झाले, सकळ ब्रह्मांड आनंदिले |
तिन्ही लोकीचे अधिपती, सद्‌गुरू सेवेसी रूजू झाले ||२५||
बडोद्यासी प्रकटलेले सगुण ब्रह्म, शक्तीपात घडवी |
साधकासी दिव्य अनुभूती देऊन, कुंडलिनीसी खेळवी ||२६||
श्री सद्‌गुरू, कधीही न करिती जातीपाती भेद |
सर्वांसी समान मानिती, करिती षट्चक्रांचा भेद ||२७||
अनंत जन्मांच्या पुण्यराशी, जेव्हा एकत्र येती |
प्रारब्ध कर्मावरी मात करून, श्री सद्‌गुरू भेटती ||२८||
जैसी ज्याची श्रद्धा, तैसा तयासी अनुभव येई |
श्री स्वामी नामाच्या गजरात, टाकरखेड्यासी आश्रम होई||२९||
श्री सद्‌गुरू स्वकरे, श्री दत्तमूर्ती आश्रमी स्थापिती |
तिथे अखंडरूपे वसू लागले, गाणगापुरीचे अधिपती ||३०||
टाकरखेडा प्रतिगाणगापूर बनू लागले, भक्तांचे लोट येऊ लागले |
भक्तीची गंगा वाहू लागली, माझिया सद्‌गुरू चरणी ||३१||
भक्त प्रथम सांसारिक अडचणीपायी, सद्‌गुरू चरणी येई |
अडचणी सर्व निवारून, श्री सद्‌गुरू त्यासी साधकमार्गाची दिशा देई ||३२||
संसारी बनू लागले साधक, साधक होऊ लागले अधिकारी |
सच्चिदानंदाचा आनंद लुटू लागले, माझ्या सद्‌गुरू कृपेने ||३३||
भक्तांनी उत्सव सुरू केले, देव भूतली उतरू लागले |
श्री सद्‌गुरूंचा जन्मोत्सव, बेंगलोर येथे सुरू होई ||३४||
कर्म, ज्ञान, भक्ती व राजयोगांचा मेरूमणी, सद्‌गुरू स्वामी माझा |
ज्याचे जसे संचित कर्म, त्यासी तसे फळ देई ||३५||



पुत्रार्थियासी पुत्र होती, कष्ट संकटे दूर होती|
सर्व प्रार्थनेस फळ येई, मोक्षार्थियांची वाट पाही ||३६||
ज्याची झोळी संपत नसे, तो नवनाथांचा नाथ असे |
ज्याचे ठायी ब्रह्माविष्णूमहेश वसे, तो माझा सद्गुरू असे ||३७||
प्रचीतिची अखंड माला, सुरू झाली अविरत नाना |
ज्याचे जे इष्टदैवत, प्रकटू लागले श्री गुरूचरणा ||३८||
माझे सद्गुरू मायेची माऊली, धरी कृपेची साऊली |
अभयवचन देऊनी, सर्व भक्तांसी तारिती ||३९||
अनंत जन्मींचे पापाचे घडे, केवळ एका नजरेने फोडे |
श्री सद्गुरू माऊलीचे, ऋण कैसे फेडावे ||४०||
श्री सद्गुरूंची भीमरथी शांती, नाशिकक्षेत्री भक्त करिती |
भक्तीसंगमात डुंबती, कैवल्यसुखाच्या शोधात ||४१||
श्री सद्गुरूंचा सहस्त्रचंद्रदर्शन सोहळा, नागपुरात आरंभिला |
पंढरपूरी जैसा भक्तीचा मळा, भाग्यवंतांनी अनुभवला ||४२||
ऐशा श्री सद्गुरूंची महती, किती सांगावी लोकांप्रती |
जेथे वैखरी थकली, स्वामींचे गुणगान गाया ||४३||
माझिया मनात स्फुरले, श्री शंकरमहाराजांनी लिहविले |
कर्ताकरविता तोचि जाणे, सद्गुरू चरणी लीन मी ||४४||
माझे हे, श्री सद्गुरू स्तवन महात्म्य अल्पमती |
अर्पण करितो, श्री स्वामी समर्थ चरणांप्रती ||४५||

शुभं भवतु, शुभं भवतु, शुभं भवतु
अनंतकोटी ब्रह्मांडनायक राजाधिराज योगीराज अक्कलकोटनिवासी
श्री स्वामी समर्थ महाराज की जय
परमपूज्य सद्गुरू श्री जनार्दन स्वामी महाराज की जय